पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 15/02/2020 (शनिवार)

(दुपार)

---

## जबरी संभोग

पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 02/09/2018 ते दिनांक 02/02/2020 23 वर्षीय पिडीत/फिर्यादी हीला आरोपी नामे– महेश नथ्थुजी वाघ, वय 28 वर्ष, रा. खानापुर मेंढी, ता. वरूड, जि. अमरावती याने तिला लग्नाचे आमिष दाखवुन वेळोवेळी पिडीतेसोबत जबरी संभोग केला व आरोपीने लग्नास नकार दिला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन) भादंवि. सहकलम 3(1)(w)(i)(i i), 3(2)(v) 3(2)( va) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. नागेश जाधव हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :– 5–6 वर्षापासुन ते दिनांक 14/02/2020 चे 09.00 वा. दरम्यान 25 वर्षीय फिर्यादी/पीडित ही ऑटो मधुन बस स्टॉप कडे येत असतांना आरोपी नामे– चारूकेश मुलचंद कापसे, वय 27 वर्ष, रा. सी/ओ उकेश कापसे ओमसाई हॉस्पीटल बोरी याने त्याच्या ॲक्टीवा मोपेडने तिचा पाठलाग करून तिला अडविले. यानंतर आरोपीने पीडितेचा विनयभंग करून म्हटले की, ''केलीली तक्रार मागे घे नाही तर पेट्रोल टाकुन तुझा चेहरा खराब करून टाकीन'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 341, 354(अ)(ड), 506(2) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि थोरात 8623074000 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर